# ॥ रघुनन्दन सांवळा ॥

पाहुनी रघुनंदन सांवळा
लाजली सीता स्वयंवराला ॥ धृ.॥

नक्षिदार अति रम्य मंडपीं
जमली सारी थोर मंडळी
उभी जानकी जनकाजवळी
घेउनी धवल फुलांची माळा ॥ १॥

धनुष्यास त्या दोर लावण्या
शूर पुरुष तो कुणी धजेना
काय करावें कांहीं सुचेना
न्याहळी दुरुनी श्रीरामाला ॥ २॥

मुनीवरांना मान देउनी
उठले रघुविर असें पाहुनी
मनासारखें येतां जुळुनी
नाचते हर्षभरानें मिथिला ॥ ३॥

गीत रमेश अणावकर
संगीत वसंत प्रभु
गायिका लता मंगेशकर

Please send corrections to sanskrit@cheerful.com
Last updated February 18, 1999